चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२८ फेब्रुवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक २७/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **घुग्घुस, वरोरा, भद्रावती, माजरी, ब्रम्हपुरी, भिसी, सिंदेवाही, गडचांदुर, कोरपना, जिवती** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **२२** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन १० आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **२,३०,११०/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

# चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

## १) पोलीस स्टेशन सिंदेवाही :—

दिनांक **२७/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **सिंदेवाही** अंतर्गत संतोषी माता वार्ड येथे ०१ आरोपी हा सटट्टापटट्टी आकडयावर पैशाची बाजी लावुन जुगारचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **सिंदेवाही** येथे अप. क्र. **२३२/२०१९** कलम १२ मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण **१,५७०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **सिंदेवाही** पोलीस करीत आहे.

---

## २) पोलीस स्टेशन गडचांदुर :—

दिनांक **२७/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **गडचांदुर** अंतर्गत नांदाफाटा येथे ०१ आरोपी हा सटट्टापटट्टी आकडयावर पैशाची बाजी लावुन जुगारचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **गडचांदुर** येथे अप. क्र. **६८/२०१९** कलम १२ मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण **३४८/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **गडचांदुर** पोलीस करीत आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस शिक्षा

पोलीस स्टेशन रामनगर अंतर्गत फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस २८/०२/२०१९ रोजी **कु.स.ज. अन्सारी, जिल्हा सत्र न्यायाधीश, जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

दिनांक १७/०३/२०१४ रोजी मौजा सिंधी कॉलनी रामनगर येथे फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही तिच्या मैत्रीणीसोबत खेळत असतांना तिला तहान लागल्याने ती पाणी पिण्यास आपल्या घरी गेली. यातील आरोपीने नामे विनोद माधवराव मुन वय ४६ वर्ष रा. रामनगर चंद्रपुर याने तिला घरी एकटी पाहुन हात लावुन तिचा विनयभंग केला. अशा फियादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अप. क्र. ९०/२०१४ कलम ४५२, ३५४(अ) भादंवि, सहकलम ८ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास सपोनि. एन. बी. किन्नाके, पोस्टे रामनगर यांनी गुन्हयातील आरोपीस निष्पन्न करून आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक २८/०२/२०१९ रोजी **कु.स.ज. अन्सारी, जिल्हा सत्र न्यायाधीश, जि. चंद्रपुर यास कलम** ३५४(अ) भादंवि मध्ये ३ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व १,०००/—रू दंड न भरल्यास ०४ महिने शिक्षा, **कलम** ४५१ भादंवि मध्ये २ वर्ष कारावासाची शिक्षा व ५००/—रू दंड न भरल्यास ०२ महिने शिक्षा, **कलम** ८ पोक्सो मध्ये ३ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व १,०००/—रू दंड न भरल्यास ०४ महिने शिक्षा, **कु.स.ज. अन्सारी, जिल्हा सत्र न्यायाधीश, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. देवेंद्र महाजन, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** यांनी काम पाहीले असुन कोर्ट पैरवी म्हणुन **पोहवा. राजु सबळ. पोस्टे रामनगर** यांनी काम पाहिले.

---

# वरोरा पोलीसांची अवैध दारूतस्करी धडक कार्यवाही

## ०२ वाहन ०४ आरोपीसह २० लक्ष ५३ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक २८ फेब्रूवारी, २०१९ रोजी वरोरा पोलीस पथक पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय माहिती मिळाली की, काही इसम दोन चारचाकी वाहनाने नागपुर कडुन चंद्रपुर कडे अवैध रित्या दारूची वाहतुक करणार आहे. अशा माहितीवरून पोलीस पथकाने नंदोरी टोल नाका येथे नाकेबंदी लावुन वाहनाची तपासणी करीत असतांना मिळालेल्या माहितीप्रमाणे दोन चारचाकी वाहने ज्यामध्ये एका महिंद्रा स्कॉर्पीओ आणि एक टाटा इंडीका येतांना दिसले. सदर वाहनास संशयावरून थांबवुन विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये मोठया प्रमाणात दारूचा साठा मिळुन आला. महिंद्रा स्कॉर्पीओ वाहनात ६८ पेटया आणि टाटा इंडीका मध्ये ५१ पेटया देशी दारू असे एकुण ११९ पेटया किं. ११,९०,०००/—रू, स्कॉर्पिओ वाहन क्र. एम.एच—२९एडी २२०१ कि. ५,००,०००/—रू, टाटा इंडीका वाहन क्र. एम.एच—३२ सी ७८८३ किं. ३,५०,०००/—रू आणि ०४ मोबाईल फोन किं. १३,०००/—रू असा एकुण २०,५३,०००/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन वरोरा येथे नोंद करण्यात आला असुन गुन्हयात ०४ आरोपीस अटक करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनाखाली वरोरा पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. उमेश पाटील यांचे सह पोलीस स्टेशन वरोरा येथील पोलीस पथकाने केली.

———————————————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# दुर्गापुर पोलीसांनी एका तासातच आणला चोरीचा गुन्हा उघडकीस

## दोन विधिसंघर्षग्रस्त बालकासह चोरीचा माल हस्तगत

दिनांक २७/०२/२०१९ रोजी फिर्यादी नामे राहुल यशवंतराव देशमुख, धंदा मोबाईल शॉप रा. मातोश्री शाळेच्या मागे तुकुम चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे तक्रार दिली की, दिनांक २६ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी २०१९ दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरांनी त्यांच्या दुकानाला लागलेला ताला तोडुन दुकानातील मोबाईल फोन व नगदी ४,०००/—रू. असा एकुण ३०,०५०/—रू चा मुददेमाल चोरून नेला आहे. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे अप.क्र. ५९/२०१९ कलम ४५७, ३८०, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शनात दुर्गापुर येथील गुन्हे शोध पथकाने तपासची चक्रे फिरवीत गोपनीय माहिती काढण्यास सुरूवात केली. काही कालावधीत पोलीस पथकास माहिती मिळाली की, सदर गुन्हयातील चोरी करणारे आरोपी हे विधीसंघर्षग्रस्त बालक आहे. यावरून समतानगर दुर्गापुर वार्ड येथील दोन विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेवुन त्यांना विचारपुस करून त्यांचे जवळ गुन्हयातील चोरीस गेलेला २९,८००/—रू चा मुददेमाल मिळुन आला असुन गुन्हयाचा पुढिल तपास दुर्गापुर पोलीस करीत आहे.

सदरचा गुन्हा दुर्गापुर पोलीसांनी नोंद झाल्याचा एका तासातच उघडकीस आणला असुन, तपास पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात, पोलीस निरिक्षक दुर्गापुर श्री. दिपक खोब्रागडे यांचे नेतृत्वात विशेष पथकातील पोउपनि गणेश झांबरे, पोहवा रजनिकांत पुठ्ठावार, सुनिल गौरकार, नापोशि. चंदु नागरे, उमेश वाघमारे, पोशि संदीप कामडी यांनी केला.

———————————————————————————————————